# NAGPUR CITY POLICE COMMISSIONERATE

नागपूर शहर पोलीस आयुक्तालय

**(पोलीस वार्तापत्र)**

दुपार

**दिनांक २५.०४.२०२६ शनिवार**

**(कामगिरी)**

**१) नागपूर शहर पोलीसांची दारूबंदी, मोटर वाहन कायद्याअंतर्गत करण्यात आलेली कारवाई :—**

दिनांक २४.०४.२०२६ रोजी, नागपूर शहर पोलीसांनी सर्व पोलीस ठाणे हद्दीत, म.दा.का. व अंमली पदार्थ विरोधी कायद्यान्वये १७ केसेसमध्ये २० ईसमावर कारवाई करून एकुण ७,६५,६५१/—रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

वाहतुक शाखा पोलीसांनी मोटार वाहन कायद्यान्वये ड्रंकन ड्राईव्ह व विविध कलमांखाली २,४७३ वाहन चालकांवर कारवाई करून, एकूण रू. २,०५,५००/—रू. ची तडजोड शुल्क वसूल केले आहे.

वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलीसांतर्फे राबविण्यात आल्या असून, यापुढेही प्रभावीपणे कारवाई करण्यात येणार आहे. वाहन चालकांनी वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळुन वाहनासंबंधी सर्व कागदपत्रे जवळ बाळगावित, असे नागरीकांना आवाहन करण्यात येत आहे.

**२) पाचपावली पोलीसांची कामगिरी :— एम.डी. पावडर बाळगणाऱ्या आरोपीस अटक.**

मा. श्री. रविन्द्रकुमार सिंगल पोलीस आयुक्त नागपूर शहर यांचे संकल्पनेतुन **''ऑपरेशन थंडर — एकत्र येवुया, नशामुक्त समाज घडवुया''** मोहीमेअंतर्गत अंमली पदार्थ विक्री करणारे तथा जवळ बाळगणारे तसेच, अंमली पदार्थाचे सेवन करणारे गुन्हेगारांविरूध्द कारवाई सुरू आहेत.

दिनांक २४.०४.२०२६ चे १७.५० वा. ते १९.०० वा. चे दरम्यान, पाचपावली पोलीसांनी मिळालेल्या खात्रीशीर माहितीवरून, पोलीस ठाणे हद्दीत, कमाल चौक, शनिवार बाजार, चिचखेडेचे घराजवळ, पंचासमक्ष सापळा रचुन, होंडा ॲक्टिवा मोपेड क्र. एमएच ४९ सीजी ३९४६ चे चालकास थांबवून, त्यास त्याचे नाव पत्ता विचारले असता, त्याने त्याचे नाव नितेश संजय हेडाऊ वय २३ वर्षे रा. बिल्डींग क्र. २३, क्वॉर्टर क्र. ३७९, म्हॉडा क्वॉटर्स, कपीलनगर, नागपुर असे सांगीतले. पंचासमक्ष त्याची झडती घेतली असता, त्याचे ताब्यात झिपलॉक पन्नीमध्ये १०.५० ग्रॅम एम.डी. पावडर किंमती ७३,५००/—रू. ची मिळुन आली. आरोपींचे ताब्यातुन एम.डी. पावडर, ०१ मोबाईल फोन, दुचाकी असा एकुण १,४५,५००/— रू. चा मुद्देमाल जप्त करण्यात आला. आरोपी हा स्वत:चे आर्थिक फायद्याकरीता एम.डी. पावडर विक्रीकरीता बाळगतांना समक्ष मिळुन आला. आरोपीस अधिक विचारपूस केली असता, त्याने त्याचा साथीदार पाहिजे आरोपी नामे जगदीश गोखले वय २५ वर्ष रा. कपीलनगर, म्हॉडा क्वार्टर, नागपूर याचेकडून एमडी पावडर विक्रीकरीता आणल्याचे सांगितले. आरोपींचे कृत्य हे कलम ८(क),२२(ब),२९ एन.डी.पी.एस. ॲक्ट नुसार होत असल्याने, आरोपींविरूध्द पोलीस ठाणे पाचपावली येथे गुन्हा नोंदविण्यात आलेला आहे. आरोपीस अटक करण्यात आली आहे. पाहिजे आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे.

वरील कामगिरी मा. श्री नविनचंद्र रेड्डी, प्रभारी पोलीस आयुक्त, मा. श्री. राजेंद्र दाभाडे, अपर पोलीस आयुक्त (उत्तर प्रभाग) नागपूर शहर, मा. श्री. राहुल मदने पोलीस उप आयुक्त (परि. क्र. ३), मा. श्री. शिवप्रसाद पारवे सहा. पोलीस आयुक्त (लकडगंज विभाग) यांचे मार्गदर्शनाखाली, वपोनि. श्री. बाबुराव राऊत, पोउपनि. रंजीत मांजगांवकर, पोहवा. मुकेश यादव, रविंद्र राऊत, सुशिल रेवतकर, पोअं. राजकुमार पाल, अमित ठाकूर यांनी केली.

**(गुन्हे)**

**<u>१) पोलीस ठाणे कळमणा :– जिवे ठार मारणाऱ्या आरोपीस अटक.</u>**

दिनांक २४.०४.२०२६ चे १८.५५ वा. चे सुमारास, पोलीस ठाणे कळमणा हद्यीत मदनी चौक, काच कंपनी, वांजरा, डायमंड नगर येथे एक इसम जखमी अवस्थेत पडलेला आहे अशा सुचनेवरुन कळमणा पोलीस नमुद ठिकाणी गेले असता, तेथे इसम नामे रोशन धरमसिंग उईके वय २७ वर्ष रा. काच कंपनीजवळ, वांजरा, नागपूर यास कोणीतरी मानेवर, पोटावर, तोंडावर शस्त्राने मारल्याने ते जखमी अवस्थेत दिसून आले. त्यांना त्वरीत मेयो हॉस्पिटल येथे रवाना केले. सीसीटिव्ही फुटेजची पाहणी करुन आजुबाजुला विचारपूस केली असता, नमुद जखमी यांना आरोपी क्र. १) जावेद उर्फ लाल शकील अंसारी वय २२ वर्ष रा. हुसेनी मस्जिदजवळ, इस्लामपुरा, वांजरा, यशोधरानगर, नागपूर २) शहबाज जहीर खान वय २५ वर्ष रा. काच कंपनीजवळ,वांजरा, यशोधरानगर, नागपूर ३) सलमान वय २१ वर्ष ४) सुलतान वय २२ वर्ष दोन्ही रा. वांजरा, नागपूर यांनी अज्ञात कारणावरुन संगनमत करुन धारदार शस्त्राने व काठीने मारहाण केल्याचे निष्पन्न झाले. जखमी यांना मेयो हॉस्पिटल येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषित केले.

याप्रकरणी सरतर्फे फिर्यादी पोअं. राकेश बेटवार यांनी दिलेल्या तक्रारीवरुन पोलीस ठाणे कळमणा येथे आरोपीविरूध्द कलम १०३(१),३(५) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. कळमणा पोलीसांनी आरोपीचा शोध घेऊन आरोपी क्र. १ यास अटक केली आहे. पुढील तपास सुरु आहे.

**<u>२) पोलीस ठाणे हिंगणा :– घरफोडी करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २२.०४.२०२६ चे १८.३० वा. ते २३.०४.२०२६ चे १५.३० वा. चे दरम्यान, पोलीस ठाणे हिंगणा हद्यीत वार्ड क्र. १५, प्लॉट क्र. ६८९, धनगरपुरा, नागपूर येथे राहणाऱ्या फिर्यादी सौ. जया ईश्वर मते वय ३१ वर्ष हया आपले राहते घराचे मुख्य दाराला कुलूप लावून परिवारासह माहेरी साईनगर, वाडी येथे गेल्या असता, कोणीतरी अज्ञात चोरट्याने फिर्यादीचे घराचे मुख्य दाराचे कुलूप तोडून, आंत प्रवेश करून बेडरुमधील लाकडी कपाटात ठेवलेले रोख १,९०,०००/– रु. तसेच सोन्याचे वेगवेगळे दागिने असा एकूण ५,२९,५००/–रू. चा मुद्देमाल चोरून नेला.

याप्रकरणी फिर्यादी यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे हिंगणा येथे पोहवा चेतन बुधबावरे ९९२३१०३५६६ यांनी अज्ञात दोन आरोपीविरूध्द कलम ३०५(अ),३३१(३),३३१(४) भा.न्या.सं. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. आरोपीचा शोध व पुढील तपास सुरू आहे

**<u>३) पोलीस ठाणे खापरखेडा :– प्राणांतिक अपघात करणाऱ्या आरोपीविरूध्द गुन्हा दाखल.</u>**

दिनांक २३.०४.२०२६ चे २३.०० वा. २३.३० चे दरम्यान, फिर्यादी यांचा साळा नामे आशिष उर्फ गोलू चिंतामणजी डोईफोडे वय २७ वर्ष रा. ईसापूर व त्याचे ०२ मित्र नामे पंकज शिवणकर वय २५ वर्ष व सुरज तेजराम महल्ले वय २५ वर्ष दोन्ही रा. ईसापूर असे तिघे फिर्यादीचे साळयाची दुचाकी डेस्टींग मोटार सायकल क्र एमएच ३२ एयु ०८१६ ने पोलीस ठाणे खापरखेडा हद्दीत, कुचक मोहल्ला, एनएच ४७ हायवे रोडवरुन जात असता कोणत्यातरी अज्ञात वाहन चालकाने त्याचे ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे

व धोकादायकरित्या चालवुन फिर्यादीचे साळयाचे मोटरसायकलला धडक देवुन अपघात करुन पळुन गेला. फिर्यादीचा साळा व त्याचे दोन्ही मित्र गाडीसह खाली पडून जखमी झाले. फिर्यादीचा साळा आशिष याचे डोक्याला जबर मार लागला. सर्व जखमी यांना उपचाराकरीता जावेद हॉस्पिटल येथे दाखल केले असता, उपचारादरम्यान फिर्यादीचे साळयास डॉक्टरांनी तपासुन मृत घोषीत केले. दोन्ही जखमी यांचा उपचार जावेद हॉस्पिटल येथे सुरु आहे.

याप्रकरणी फिर्यादी संजय रामभाऊ वाघ वय ४८ वर्षे, रा. दिग्रस, नागपूर ग्रामिण यांनी दिलेल्या तक्रारीवरून पोलीस ठाणे खापरखेडा येथे मपोउपनि प्रियंका पाटील ७४४७८१८९६६ यांनी अज्ञात वाहन चालकाविरूध्द कलम २८१,१०६(१),१२५(अ),१२५(ब) भा.न्या.सं., सहकलम १३४,१८४ मो.वा.का. अन्वये गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास सुरू आहे.

**(अकस्मात मृत्यु)**

**<u>पोलीस ठाणे इमामवाडा</u> :—** दिनांक २४.०४.२०२६ चे २१.३० वा. चे सुमारास, पोलीस ठाणे इमामवाडा हद्दीत, प्लॉट क्र. ७५ चे वॉल कंपाऊंडसमोर, रामबाग ले आऊट, इमामवाडा येथे एक अनोळखी पुरूष वय अंदाजे ३५ वर्षे वयाचे, बेशुध्द अवस्थेत मिळुन आल्याने, त्यांना उपचाराकरीता मेडीकल हॉस्पीटल,अजनी येथे नेले असता, डॉक्टरांनी त्यांना तपासून मृत घोषीत केले. मृतकाची ओळख अद्याप पटलेली नाही. मृतकाचे वर्णन:—रंग—सावळा, चेहरा गोल, बांधा सडपातळ, उंची ५ फुट ४ इंच, डोक्याचे केस पांढरे काळे, अंगात पांढरे रंगाचा मळकट फुल शर्ट व निळ्या रंगाचा जिन्स पॅन्ट घातलेला आहे. नमुद मृतकास ओळखणाऱ्यांनी पोलीस ठाणे इमामवाडा येथे संपर्क साधावा.

याप्रकरणी प्राप्त वैद्यकीय सुचनेवरून पोलीस ठाणे इमामवाडा येथे पोउपनि. निलेश टेमगिरे ९६८९५८४८३० यांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे. पुढील चौकशी सुरू आहे.

**(ईतर)**

**<u>आरोपींनी न्यायालयात हजर होणेबाबत :—</u>**

मा. विद्यमान न्यायाधीश यांनी त्यांचे कोर्टातील केस क्र. व कलम मधील खालील नमुद आरोपी/साक्षीदार हे तारखेवर सतत गैरहजर राहत असल्याने त्यांचेविरुध्द जाहीरनामा प्रसिध्द केला आहे. खालील तक्त्यात नमुद आरोपी / साक्षीदार यांनी नमुद तारखेपर्यंत मा. न्यायालयासमोर हजर व्हावे.

| अ | कोर्टाचे नाव | केस क्र. | कलम | आरोपीचे नाव व पत्ता | पेशी तारीख |
|---|---|---|---|---|---|
| १. | मा. १६वे सहदिवाणी न्यायाधीश क.स्तर तथा प्रथम श्रेणी न्याय दंडाधिकारी, नागपूर. | ३०५०१२५ /२००३ | कलम ४५७,३८०, ३४ भा.दं..वी | मुकेश टी. टंडन रा. सतनामी नगर, मदन दवाखान्यामागे, प्लॉट क्र. १०१ येथे किरायाने, लकडगंज, नागपूर. | २९.०४.२०२६ |

**स्वा/—**
**( अंकुश राठोड )**
**पोलीस उप निरीक्षक,**
**पोलीस जनसंपर्क अधिकारी,**
**नागपुर शहर.**